क्र./रा.भू.अ.आ.का.४/वाडीविभाजन/२०१७.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे
दिनांक - २७/०३/२०१७.

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)

विषय — ई-फेरफार आज्ञावलीची अंमलबजावणी

---

वाडी विभाजन होऊन तयार झालेल्या नवीन महसूल गावांबाबत.

DILRMP अंतर्गत ई-फेरफार आज्ञावलीची अंमलबजावणी सध्या संपुर्ण राज्यभर सुरु आहे. अनेक जिल्हयांकडून वाडी विभाजन होऊन तयार झालेल्या नविन महसूल गावांबाबत अनेक संदर्भ इकडे प्राप्त होत आहेत. याबाबत करावयाच्या खालीलप्रमाणे कार्यवाहीबाबत सूचना देण्यात येत आहेत.

१. हस्तलिखीत गा.न.नं. ७/१२ व फेरफार प्रक्रिया चालू असतानाच ज्या महसूली गावांमधून वाडी विभाजन होऊन किंवा अन्य कारणाने नविन महसूल गावांची निर्मिती झाली होती व भूमि अभिलेख विभागाने नविन व जुन्या गांवचा सुधारित आकारबंद (गा.न.नं.१) तयार करुन गाव दप्तर तयार करुन प्रत्यक्ष वापरात आले होते. तथापि २००२ पासुन संगणकीकृत झालेला डेटा unicode मध्ये convert करुन डेटा सीडी अपलोड करताना तो नजरचुकीने / अनावधाने गांव विभाजनाची कार्यवाही राहून गेली असल्यास व एकाच मुळ गांवात या दोन्ही महसुल गावांचा डेटा SDC वर अपलोड झाला असलेने शेवटचा फेरफार क्रमांक भरुन पुढील ऑनलाईन फेरफार या गावांत घेता येत नाहीत. अशा सर्व गावांचा डेटा SDC वर अपलोड करण्यासाठी पाठविलेल्या डाटा सीडी मधुन गांव विभागणी करुन ऑफ लाईन पध्दतीने दोन स्वतंत्र गांवे निर्माण करण्यात यावीत. नविन गांवाला Census Code देताना तो योग्य असल्याची खात्री करावी. त्यानंतर पुन्हा १ ते १४ अहवाल निरंक करुन ODBA tool मधील सर्व अहवाल प्रमापत्रासह ( जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीने ) अद्ययावत डाटा सीडी सादर केल्यास ती SDC वर अपलोड करता येईल व त्यानंतर पुन्हा हस्तलिखीत शेवटचा फेरफार क्रमांक नमुद करुन पुढील फेरफाराच्या ऑनलाईन पध्दतीने नोंदी घेता येतील.

२. हस्तलिखीत ७/१२ व फेरफार बंद करुन गावाचे सर्व कामकाज ऑनलाईन सुरु झाल्यानंतर एखाद्या गावातुन वाडी विभाजनाने किंवा अन्य कारणांने गावांचे विभाजन झाले असल्यास अशा गावांचे विभाजन ऑनलाईन पध्दतीने ई-फेरफार मधुन वाडी विभाजनाचा फेरफार घेऊन दोन स्वतंत्र गांवे तयार करता येतात. याबाबत कोणताही डाटा पुन्हा अपलोड करण्याची गरज भासणार नाही.

उपरोक्त कार्यवाही करण्यापूर्वी आपल्या जिल्हयातील तालुकानिहाय गावाचा आढावा घेऊन खालील माहिती या कार्यालयाकडे पाठवावी.

१) ऑफलाईन पध्दतीने कार्यवाही करावयाच्या वाडी विभाजनाच्या गावांची नावे व संख्या.

२) ऑनलाईन पध्दतीने कार्यवाही करावयाच्या वाडी विभाजनाच्या गावांची नावे व संख्या.

याप्रमाणे कार्यवाही आपल्या स्तरावर करुन आपल्या जिल्हयातील तालुका निहाय एकुण महसूली गांवे व प्रत्यक्ष ऑनलाईन झालेली महसूली गांवे यांचा आढावा घेऊन सर्व गांवे दिनांक ३० एप्रिल २०१७ अखेर ऑनलाईन होतील याची दक्षता घ्यावी.

(शाम खामकर)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण) पुणे.

स्थळ प्रतीवर मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.रा.) पुणे यांची स्वाक्षरी असे.

प्रत :- मा. प्रधान सचिव (महसूल) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- विभागीय आयुक्त, पुणे / कोकण / औरंगाबाद / नाशिक / नागपूर / अमरावती.

प्रत :- राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र.